
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२६ मे २०२५


## थोडक्यात

### राहुल गांधींसमोर उभं राहिलं नवं संकट
### मानहानी प्रकरणात अजामीनपात्र वॉरंट जारी



**दि.२५, झारखंड :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. यामुळे राहुल गांधी यांच्यासमोर नवं संकट उभं टाकले आहे. वॉरंट जारी करताना न्यायालयाने राहुल गांधींना २६ जून रोजी न्यायालयात हजर राहण्याचेही आदेश दिले आहेत. भाजप नेते प्रताप कटियार यांनी राहुल गांधीविरोधात २०१८ रोजी हा मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यावर आज न्यायालयाने राहुल गांधींविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. राहुल गांधींच्या वकिलाने न्यायालयात हजर राहण्यापासून सूट मिळावी यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. पण न्यायालयाने ते फेटाळून लावत राहुल यांना २६ जून न्यायालयात हजर राहण्यास निर्देश दिले आहेत.

**नेमकं प्रकरण काय?**

राहुल गांधींविरुद्धचा हा खटला ५ वर्षे जुना असून, राहुल गांधी यांनी २८ मार्च २०१८ रोजी काँग्रेसच्या अधिवेशनात भाजपविरोधात भाषण दिले होते. त्यानंतर भाजपची प्रतिमा खराब झाल्याचा दावा करत भाजप नेते प्रताप कटियार यांनी राहुल गांधीविरोधात ९ जुलै २०१८ रोजी चाईबासा सीजेएम न्यायालयात राहुल गांधींविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यावर आज न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधींविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी करत न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. २० फेब्रुवारी २०२० रोजी झारखंड उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा खटला सीजेएम न्यायालयातून रांचीच्या स्पेशल कोर्ट एमपी-एमएलए यांच्याकडे सुनावणीसाठी पाठवण्यात आला होता. याची दखल घेत एमपी-एमएलए कोर्टाच्या न्यायदंडाधिकाऱ्यांनी राहुल गांधींना समन्स पाठवले होते परंतु, त्यावेळी राहुल गांधी न्यायालयात हजर राहिले नाहीत. सुरुवातीला जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आला. त्यानंतर, गांधी यांनी वॉरंटला स्थगिती देण्यासाठी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली होती. २० मार्च २०२४ रोजी ही याचिका निकाली काढण्यात आली. त्यानंतर राहुल गांधींनी प्रत्यक्षात हजेरीपासून सूट मिळावी यासाठी याचिका दाखल केली. मात्र, चाईबासा न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावत राहुल गांधींविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी करत त्यांना २६ जून रोजी प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

### मुंबईला हायअलर्ट! अतिमुसळधार पावसाचा इशारा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा कहर सुरू असून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होत आहे. एकीकडे शेतकरी हवालदार झाला आहे, तर दुसऱ्या बाजूला मुंबईत आज सकाळपासून चाकरमान्यांचे हाल होतांना दिसत आहे. हवामान खात्याकडून मुंबईत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. पहाटेपासून मुंबई शहर आणि उपनगरात संततधार सुरू आहे. समुद्रात येणाऱ्या भरतीमुळे आज रात्री दहा वाजत समुद्र रौद्ररूप धारण करणार आहे.

याच पार्श्वभूमीवर भरतीमुळे चार ते पाच मिटर उंच लाटा उसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यानच्या काळात नागरिकांनी पर्यटकांनी समुद्राच्या जास्त जवळ जाऊ नये, अशा प्रकारचा आवाहन महापालिका प्रशासनाकडून केला जात आहे. तरी देखील मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरा असो की दादर चौपाटी जुहू चौपाटी, गिरगाव चौपाटी या ठिकाणी अनेक मुंबईकर आणि पर्यटकांनी गर्दी केल्याचा पाहायला मिळत आहे. अनेक जण समुद्राच्या लाटांचा आणि पावसाचा आनंद लुटताना दिसत आहे. यंदा मान्सून वेळेआधीच केरळमध्ये दाखल झाल्याचं पाहायला मिळतंय. २००९ नंतर पहिल्यांदाच मान्सून केरळमध्ये इतक्या लवकर दाखल झालाय. दरवर्षी १ जून रोजी येणारा मान्सून यंदा मात्र २३ मे रोजीच केरळमध्ये पोहचलाय. मान्सूनने केरळबरोबर तामिळनाडू अन् कर्नाटकला घेरलंय. हवामान विभागाने या तिन्ही राज्यांसाठी पावसाचा रेड अलर्ट दिला आहे.

दरम्यान आता मान्सूनची वाटचाल गोव्याकडे सुरु झाल्याचं कळतंय. पुढच्या दोन-चार दिवसांमध्ये मान्सून कोकण-गोव्यात येण्याची शक्यता देखील हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. मान्सूनची वाटचाल महाराष्ट्राच्या दिशेने सुरू झाली आहे, असं मुंबई येथील विभागीय हवामानशास्त्र केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी टीव्ही नाईनसोबत बोलताना सांगितल्याचं कळतंय. मुंबई आणि पुण्यात रात्रीपासून रिमझिम पाऊस सुरु असून पुण्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून अधूनमधून रिमझिम पाऊस बरसत आहे. हा पाऊस पुढील दोन दिवस कायम राहणार असल्याचं देखील हवामान विभागाने स्पष्ट केलंय.

## दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार : चर्चा अंतिम टप्प्यात ?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पंढरपूर :** गेल्या अनेक दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. (छउझ) त्याचवेळी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याचीही चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे दोन्ही पवार देखील एकत्र येणार असल्याची चर्चा होत आहे. यावर आता राष्ट्रवादीच्या खासदार सुन`त्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे, त्या पंढरपूरमध्ये महिला मेळाव्यात बोलत होत्या.



राजकारण आणि कुटुंब या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, दोन्ही पक्ष एकत्र येणार ही फक्त चर्चा आहे. जे काही होईल ते आपण बघालच असे म्हणत दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणारवर प्रतिक्रिया देताना सुनेत्रा पवार यांनी हात जोडत, या विषयावर अधिक बोलणं टाळलं आहे.

दरम्यान, पुण्यातील विवाहिता वैष्णवी हगवणे हीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सासरच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे, या घटनेनं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे, यावर देखील सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

वैष्णवी हगवणे बाबत झालेल्या घटनांचे समर्थन करत नाही, अशा घटना व्हायला नको आहेत. पक्षाने याबाबत भूमिका मांडलेली आहे. महिला आयोगाकडून दिरंगाई होते याबाबत सुद्धा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने भूमिका मांडलेली आहे, अशी प्रतिक्रिया या प्रकरणावर सुनेत्रा पवार यांनी दिली आहे.

ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा केले जातात. मात्र अजूनही वाढीव रकमेबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, यावर बोलताना सुनेत्रा पवार यांनी म्हटलं की, लाडक्या बहिणींच्या वाढीव हप्त्याबाबत अजितदादा निर्णय घेतील, ते जे बोलतात ते करतात, आपल्याला माहीत आहे.

## राज्यभरात मान्सूनपूर्व पावसाचा हाहाकार !

### सिन्नरमध्ये शिवशाही बसवर स्लॅब कोसळला, दौंडमध्ये घरं पाण्याखाली...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पुणे :** महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा हाहा:कार बघायला मिळतोय. पुण्यात दौंड, बारामती इथे तर तुफान पाऊस पजतोय. बारामतीत ढगफुटीसदृश्य पाऊस पडल्याची माहिती मिळत आहे. यामुळे तीन इमारती खचल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तर दौंडमधील एका गावात अनेक घरे हे पाण्याखाली गेल्याची माहिती मिळत आहे. पुण्यात दररोज पाऊस पडतोय. मान्सूनचं आगमन होण्यापूर्वी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहा:कार माजवला आहे. नाशिकच्या सिन्नर बस स्थानकावर तर धक्कादायक घटना घडली आहे. इथे शिवशाही बसवर बस स्थानकाचा स्लॅब कोसळला आहे. या घटनेचे दृश्य अंगावर काटा आणणारे आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप आलेली नाही. तर तळकोकणात मान्सून दाखल झाल्याची देखील माहिती मिळत आहे.

**सिन्नर स्थानकावर काय घडलं?**

नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस पडला. एकट्या नाशिक शहरात आज ३०.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सिन्नर, कळवण, निफाड आणि नांदगाव तालुक्यात प्रचंड पाऊस पडला आहे. सिन्नर तालुक्यात तर ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने सिन्नर बस स्थानकाचा स्लॅब तिथे उभ्या असलेल्या शिवशाही बसवर कोसळल्याची माहिती मिळत आहे. तिथे एक खाजगी चारचाकी गाडी देखील उभी होती. त्यावरही हा स्लॅब कोसळला. यावेळी शिवशाही बसमधील प्रवाशांना आपातकालीन खिडकीतून बाहेर काढलं. सुदैवाने सर्व प्रवाशी सुखरुप असल्याची माहिती आहे. सध्या घटनास्थळी मलबा बाजूला करण्याचं काम सुरु आहे.

**दौंडमध्ये गाडी वाहून गेली**

पुण्याच्या दौंड तालुक्यात पावसाचं आक्राळविक्राळ रुप बघायला मिळालं. गेल्या चार दिवसांपासून दौंड तालुक्यात पावसाचा जोर सुरू आहे. त्यामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील स्वामी चिंचोली या गावात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. पावसाच्या हाहा:काराने पुणे-सोलापूर महामार्गावरील एक इनोव्हा कार वाहून गेली. सुदैवाने यामध्ये कोणती जीवितहानी झाली नाही. मात्र पुणे-सोलापूर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्याने वाहतूक ठप्प झालीय. याशिवाय स्वामी चिंचोली गावात अनेक घरं पाण्याखाली गेल्याची माहिती आता मिळत आहे.

**बारामतीत मुसळधार पाऊस !**

पुण्याच्या बारामती तालुक्याला देखील पावसाने झोडपलं आहे. बारामतीमधील लिमटेक येथे निळ्या डाव्या कालव्याला भगदाड पडलं आहे. कालव्याचं पाणी शेतात आणि घरांमध्ये शिरलं आहे. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर एनडीआरएफची टीम बारामती आणि दौंड तालुक्यात दाखल झाली आहे. बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील नागरिकांना गरज असेल तरच घराबाहेर पडा, असं आवाहन केलं आहे.

**इंदापूरमध्येही हाहा:कार !**

पुण्यातील इंदापूर तालुक्यातही जोरदार पाऊस पडतोय. भिगवन-बारामती रस्त्यावर असणाऱ्या ओढ्याला पूर आला आहे. पुराचं पाणी रस्त्यात आणि घरांमध्ये शिरलं आहे. या भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संर्पक तुटला आहे. तसेच भिगवणमध्ये देखील अनेक घरांममध्ये पाणी शिरलं.

**राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट**

राज्यभरात सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. ही परिस्थिती उद्या देखील असण्याची शक्यता आहे. राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**साताऱ्यातही पावसाचा धुमाकूळ**

सातारा जिल्ह्यातही पावसाने धुमाकूळ घातला आहे. कोळकी-फलटण रस्त्यावरील ओढ्याला पूर आला आहे. या पुरात एक दुचाकीस्वार थोडक्यात बचावला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याशिवाय बीड, अहमदनगरमध्येदेखील जोरदार पाऊस पडला आहे. बीडच्या आष्टी तालुक्यातील कडा गावात तर आष्टी-जामखेड रस्त्यावर कडा गावातील मातीचा पूल वाहून गेला आहे. तर सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातही जोरदार पावसाने बॅटिंग केली आहे.

## पारनेर तालुक्यात विविध भागात पावसाची दमदार हजेरी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये धुवाधार पाऊस झाला असून सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. गेल्या आठ दहा दिवसापासून पारनेर तालुक्यात सातत्याने पाऊस पडत असून रविवारी ही तालुक्यातील विविध भागात चांगला पाऊस झाला आहे. रविवारी दिवसभर तालुक्यात सुर्यदर्शन झाले नाही. दुपारी चार नंतर जोराच्या पावसाला सुरुवात झाली. तिखोल येथे सायंकाळी चार ते पाच यावेळेत तूफान पावसाने जनजीवन विस्कळित झाले. ओढ्याला पूर आल्याने सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. तिखोल परिसरात गेल्या आठवड्यात सोमवार २ मे रोजी वादळी वाऱ्यासह पावसाने आणि गारपिटीने शेतकऱ्यांचे शेती पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान केले होते. रविवारी त्याच भागात पुन्हा तिखोल, टाकळी ढोकेश्वर, वनकुटे आणि सुपा परिसरात अतिवृष्टी झाल्याने मे महिन्यात अवकाळी पावसाने गेल्या अनेक वर्षांचा विक्रम मोडला आहे.



प्रशासनाने या भागात तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. टोमॅटो, कोबी, झेंडू कांद्यासह फळबागा पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून टोमॅटो लागवड केली होती. पण आता सर्व काही पाण्याखाली गेले. असे तिखोल येथे प्रगतशील शेतकरी सुभाष ठाणगे व जालिंदर ठाणगे यांनी सांगितले.




## माणसाचे वर्तन

आजकाल माणसाची जीवन जगण्याची पद्धत पूर्णपणे बदलून गेली आहे. माणूस माणसासारखे वर्तन न करता मोकाट जनावराप्रमाणे वागत करत आहे. मानवतेला अशोभनीय वर्तन करून माणुसकीला काळीमा फासत आहे. स्त्रिया, महिला व मुलींकडे स्वच्छ व निकोप दृष्टिकोनातून न बघता वासनांध व वखवखलेल्या नजरेने बघत आहे. सार्वजनिक ठिकाणी चार शहाण्या लोकांत जाऊन जोरजोराने बोलत आहे. आणि नाहक बोलून त्यांच्या चर्चेत व्यत्यय आणत आहे. म्हणजे आपण किती शहाणे व हुशार आहोत हे लोकांना दाखवून देत आहे. असेच म्हणावे लागेल. काही काही महाभाग तर रस्त्याने चालत असताना मुद्दाम छाती वर काढून चालतात. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या माणसांना व समाज बांधवांना साधा नमस्कार सुद्धा घालत नाहीत. माणुसकीच्या नात्याने चार शब्द न बोलता आपल्याच तोऱ्यात चालतात.म्हणजे आपण खूप शहाणे व स्पेशल आहोत, असे त्यांना वाटते. इतका गर्व आणि अहंकार काय कामाचा? असे मानवतेला अशोभनीय वर्तन काय कामाचे? आपला देश हा सुशिक्षित युवकांचा देश आहे. म्हणजे आपल्या देशात सुशिक्षित तरुणांची संख्या जास्त आहे. तरीही आपल्या देशातील बहुतांश लोक मानवतेला शोभणारे वर्तन करत नाहीत. हीच खरी देशाची शोकांतिका म्हणावी लागेल. देशात महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. माणूस मानवतेला विसरून खुशाल राक्षसी कृत्य करत आहे. अल्पवयीन मुली व वृद्ध महिलांना दिवसाढवळ्या बलात्कार करून जिवंत जाळले जात आहे. जर एखादी महिला रस्त्याने जात असेल तर काही वासनांध पुरुष त्या महिलेवर अश्लील टिप्पणी करतात. तिला अश्लील भाषेत बोलून तिची मानहानी करतात. म्हणून आजकाल महिलांना व मुलींना संरक्षणाची नितांत गरज आहे. आपला देश विविध क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडत आहे. आपला भारत देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. पण आपल्या भारतीय लोकांच्या वर्तणुकीत अजूनही म्हणावा तसा अमुलाग्र बदल घडून आलेला दिसत नाही. माणूस अजूनही मानवतेला शोभणारे वर्तन न करता मानवतेला काळीमा फासणारे वर्तन करत आहे. घरातील आई-वडिलांचा, आजी आजोबांचा व गावातील ज्येष्ठ नागरिकांचा अपमान करत आहे. त्यांच्या शब्दांना व त्यांच्या विचारांना कवडीमोल समजत आहे. अशाप्रकारे माणूस मानवतेला अशोभनीय कृत्य करून माणुसकीला बट्टा लावत आहे. हल्ली माणसांची मने दूषित व गढूळ पाण्याप्रमाणे झाली आहेत. त्यांच्या मनात स्वार्थ, कपट आणि वासना ठासून भरलेली आहे. म्हणून ते माणसांसारखे न वागता सैतानासारखे वागत आहेत. बोलण्याला लिमिट न ठेवता कुठेही काहीपण व कितीही बरगळत आहेत. सार्वजनिक ठिकाणी आपल्या ओंगळ वर्तनाचे प्रदर्शन करत आहेत. स्वतःला भारी व श्रेष्ठ समजून दुसऱ्यांना कमी लेखत आहेत. आई वडील शेत नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जीवे मारण्याचा प्रयत्न करत आहेत. गुंठाभर जागेसाठी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीच्या पायऱ्या चढत आहेत. तेव्हा माणुसकी रसातळाला गेली की काय? हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. माणूस एवढा कठोर आणि निष्ठूर ह्दयाचा का झाला आहे? कळायला मार्ग नाही. हेच माणसाचे ओंगळवाणे वर्तन मानवतेला दूषित करत आहे. आपल्या भारत देशात अनेक थोर संत, महापुरुष, विचारवंत व तत्त्ववेत्ते जन्माला आले. त्यांनी आपल्या देशात चांगल्या विचारांची पेरणी करून चांगले वर्तन करण्याचा उपदेश केला. माणसाने माणसाशी माणसासम वागावे हा मानवतावादी संदेश दिला. आपल्या वर्तनातून लोकांवर एक आगळीवेगळी आणि जबरदस्त छाप सोडली. त्या मानवतावादी महापुरुषांचा नामोल्लेख आवर्जून करावा वाटतो. थोर विचारवंत तथागत गौतम बुद्ध, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज व मानवतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी आपल्या शुद्ध वर्तनाला कधीच डाग लागू दिला नाही. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या वर्तणुकीला मानवतेची जोड दिली. या महापुरुषांमध्ये मानवता ठासून भरली होती आणि ती मानवता बावनकशी सोन्यासारखी झळकत होती म्हणूनच त्यांच्या वर्तनात मानवताच मानवता दिसत होती. आज संपूर्ण जग या महामानवांची प्रेरणा घेऊन आपल्या वर्तनात योग्य असा बदल करत आहे. तेव्हा समस्त भारतीयांना कळकळीची नम्र विनंती आहे की, बांधवांनो आपण आपल्या महापुरुषांचे आचार व विचार आत्मसात करून आपल्या वागण्यात, बोलण्यात व राहणीमानात योग्य असा बदल करून मानवतेला शोभणारे वर्तन ठेवावे...समाजात व गावात वावरत असताना स्वतःतील मानवता कलंकित होणार नाही याची दक्षता घ्यावी...तेव्हा नक्कीच आपला देश युद्धाच्या नव्हे तर बुद्धाच्या मार्गाने जाईल...कारण बुद्धाचा धम्म हा मानवतावादी आहे.

# लोकांतील, लोकांचा लोकनेता : विलासराव देशमुख

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची आज ८० वी जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २६ मे १९४५ रोजी लातूरमधील बाभळगावमध्ये त्यांचा जन्म झाला. विलासरावांनी पुण्यात बीएससी, बीए, एलएलबी यासारखे उच्च शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर विलासराव आपल्या गावी बाभळगावला परतले. १९७४ साली विलासराव बाभळगाव चे सरपंच झाले. १९७५ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. १९८० साली त्यांनी पहिल्यांदा लातूर विधानसभा मतदार संघातून आमदारकीची निवडणूक लढवली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार म्हणून ते निवडून आले. १९८२ साली त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झाली. त्यांनी कृषी, ग्रामविकास, सहकार, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९८६ साली ते महसूल आणि सहकार या महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री बनले. उद्योग आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामामुळेच ते सलग तीनदा विधानसभेत निवडून गेले मात्र १९९५ सालची विधानसभा निवडणूक त्यांना जिंकता आली नाही. १९९२- ९३ साली झालेल्या दंगली आणि बॉम्बस्फोट, काँग्रेसमधील सुंदोपसुंदी, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर झालेले आरोप, एनरॉन प्रकरण यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यात विलासरावांचाही समावेश होता. विलासराव देशमुख यांना जनता दलाच्या शिवाजी कव्हेकर यांनी पराभूत केले. आपल्या गडात झालेला पराभव विलासरावांना खूप लागला. विलासराव देशमुख पडावेत यासाठी तेंव्हा काँग्रेसमध्ये असलेल्या बड्या नेत्याने प्रयत्न केल्याचे तेंव्हा बोलले जात होते. १९९५ साली राज्यात भाजप शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते विधिमंडळात नाही याची विलासरावांना खंत वाटत होती त्यामुळे काहीही करून विधिमंडळात जायचे असा चंग त्यांनी बांधला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९९६साली विधानपरिषद निवडणूक लागली मात्र काँग्रेसच्या हायकमांडने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे बंडखोरी करून विधान परिषदेसाठी उभे रहा असा आग्रह त्यांना त्यांच्या समर्थकांनी केला. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांनी त्यांना तसा सल्ला दिला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तर त्यांना थेट शिवसेनेत येण्याची ऑफर दिली मात्र सारं आयुष्य काँग्रेस संस्कृतीत गेल्याने शिवसेनेत जाणं विलासरावांना शक्य नव्हतं म्हणून ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत शिवसेनेने त्यांना मदत केली तरीही त्यांचा अवघ्या अर्ध्या मतांनी पराभव झाला. विधान परिषद निवडणुकीत प्रत्येक मताला ठराविक मूल्य असतं आणि मत मोजण्याची पद्धतही वेगळी असते. सलग दोन वर्षात दोन पराभव झाल्याने विलासरावांचे राजकारण संपले, विलासराव आता पुन्हा निवडून येऊ शकत नाही अशी टीका त्यांच्यावर होऊ लागली मात्र हार मानतील ते विलासराव कसले ? विलासरावांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली. जनतेत गेले, जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडले त्याचे परिणाम लवकरच दिसले. १९९९ साली शरद पवार काँग्रेस मधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याच वर्षी म्हणजे १९९९ साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांच्या विरोधात लढले तर शिवसेना भाजपने युतीत एकत्र निवडणुका लढवल्या. एकत्र लढूनही भाजप सेना



युतीला बहुमत मिळाले नाही त्या दोन्ही पक्षांना मिळून १२५ जागा मिळाल्या तर स्वतंत्र लढलेल्या काँगेसला ७५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या. निकाला नंतर काँग्रेस राष्ट्रवादी यांच्यात सरकार स्थापने साठी बोलणी सुरू झाली. छोट्या मोठ्या पक्षांनी देखील काँगेस आघाडीला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. सर्वाधिक जागा काँग्रेसच्या निवडून आल्याने काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले. काँग्रेस कडून लातूर मतदार संघातून विलासराव देशमुख सर्वाधिक मते घेऊन जिंकून आले होते. ज्या मतदार संघात त्यांचा पराभव झाला होता त्याच मतदार संघात ते पुन्हा विक्रमी मतांनी निवडून आले होते त्यामुळे मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत ते सर्वात पुढे होते शिवाय अपक्ष म्हणून जिंकून आलेल्या आमदारांनीही विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री असावेत अशी अट ठेवल्याने काँग्रेस हायकमांडने त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली. जिंकून आलेल्या सर्व आमदारांनी विलासरावांना एकमुखी पाठिंबा दिला आणि ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. सलग दोन पराभव स्वीकारून ही थेट मुख्यमंत्रीपद मिळाल्याने विलासरावांची पराभवाची सल दूर झाली. काँगेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले पण २००३ साली त्यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र अवघ्या वर्षभरात म्हणजे २००४ साली त्यांची मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या काँग्रेसच्या सर्व आमदारांनी विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री हवेत अशी मागणी केल्याने त्यांचीच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. २००४ साली विलासराव दुसऱ्यांना मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री पदाच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी चांगले काम केले मात्र २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला आणि त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले मात्र अल्पावधीतच त्यांची केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. १४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यांचे आकस्मिक निधून महाराष्ट्रातील जनतेला धक्का देऊन गेले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला.

**- श्याम ठाणेदार -**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

**विलासराव देशमुखांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

# लोमटे यांच्या हस्ते नूतन जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा सत्कार

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२५, धाराशिव :** भारतीय जनता पक्षाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी दत्ताभाऊ कुलकर्णी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार भाजपा प्रतिष्ठा भवन, धाराशिव येथे करण्यात आला. तुगांव येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन लोमटे व त्यांच्या मित्रपरिवारातर्फे हा सत्कार करण्यात आला.

या वेळी नूतन जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, माजी नगराध्यक्ष बालाजी कोरे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. अनिल काळे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पुनगडे, जिल्हा परिषद माजी सदस्या अंजलीताई बताळे, सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा देवकन्या गाडे उपस्थित होते. तसेच आशाताई लांडगे, शशिकला मुंडे, अनिता तोडकर, शिवानी परदेशी, गुणवंत अप्पा सुतार, शिक्षक अंकुश जाधव, लहू शिंदे, गणेश पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी दत्ताभाऊ कुलकर्णी यांना जिल्हाध्यक्षपदासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या व आगामी काळात त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्ष संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भिलार गाव..

भिलार नावारूपास
पुस्तकांचेगाव खास
जगात आश्चर्य दुसरे
बदलून जा इतिहास

प्रचिती इथेयेई सदैव
नव निर्मीतीचा ध्यास
साहित्य मंदिर हे उभे
घडवला स्थीर न्यास

कथा कविता चरित्रे
लेख निबंध उपन्यास
साहित्याची सर्व क्षेत्रे
भूत भविष्य इतिहास

जेवायला मिळे कुठेही
लाभे इथे बुध्दी घास
याल रहाल न् वाचाल
शांतता तृप्तता मनास

पुन्हा पुन्हा द्यावी भेट
हृदयात येईलं हो आस
जे जे प्रियतम रे ज्यास
ते ते सगळे मिळे त्यास

संकुचित भले रे बुध्दी
सहज वाढेल तो व्यास
रे पक्ष्यांच्या गुंजारवात
घ्या इथे मोकळा श्वास

खजिना इथे भरभरून
प्रसन्न चित्त होई उदास
भले असो कुणी मोठा
सहज होई पुस्तक दास

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# शक्तीला भक्तीची जोड असेल, तर विजय निश्चित असतो !

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याची सिद्धता केल्याचे पाहून पाकिस्तानच्या सैन्यदलातील अनेक अधिकारी आणि सैनिकांनी नोकऱ्या सोडल्याचे वृत्त वाचनात आले होते तर दुसरीकडे भारतात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे कळताच देशाच्या कानाकोपऱ्यातून अग्नीवर आणि सैनिक भारताच्या सीमेवर दाखल झाले होते ज्यामध्ये नुकतेच लग्न झालेले नवविवाहितसुद्धा होते आणि ज्यांच्या घरात कुणाचा तरी मृत्यू झाला होता असे शोकग्रस्तसुद्धा होते. मातृभूमीप्रती अपार आदर आणि भक्ती भारतीयांच्या रक्तातच असल्याने जेव्हा जेव्हा देशावर संकट चालून येते तेव्हा देशातील प्रत्येक नागरिक आपापल्या परीने काहीनाकाही करण्याचा प्रयत्न करत असतो. काहीच नाही तर सैनिकांच्या प्राणांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना तरी नक्कीच करतो. ऑपरेशन सिंदूरचा वेळी आपण सर्वांनीच याचा अनुभव घेतला आहे. प्रत्येक भारतीय नागरिक हा आपला पक्ष, संघटना, जात-पात बाजूला ठेवून एक भारतीय म्हणून सैन्यबळाच्या रक्षणासाठी प्रार्थना करत होता, सोशल मीडियाच्या माध्यमातून इतरांनाही प्रार्थना करण्याचे आवाहन करत होता. प्रार्थनेत संघटन असते आणि संघटनेत बळ असते, ऊर्जा असते. सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना ऊर्जा देण्याचे काम भारतीय नागरिक करत होते. भारत ही शक्ती आणि भक्तीची भूमी आहे. दुष्टांच्या संहारासाठी आणि भक्तांच्या रक्षणासाठी इथे भगवंताने अनेकदा अवतार घेतले आहेत. ऋषीमुनींनी येथील व्यवस्था राखण्याचे काम केले आहे. साधू संतांनी सत्वशील समाज घडवण्यासाठी योगदान दिले आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे, परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान असले पाहिजे'. कोणत्याही चळवळीला भगवंताचे अधिष्ठान असणे अत्यंत महत्वाचे असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ रायरेश्वराच्या मंदिरात शिवपिंडीवर आपल्या रक्ताचा अभिषेक घालून घेतली. समर्थ रामदास स्वामी आणि संत तुकाराम महाराज अशा दोन महान विभूतींचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी होते. वेळोवेळी ते त्यांचे मार्गदर्शन घेत होते. 'जगदंब जगदंब' असा अखंड जप त्यांचा चालू असे. भवानी मातेचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी होते. साधुसंतांच्या आशिर्वादातून मिळालेले अध्यात्मिक बळ आणि स्वराज्यासाठी प्राणार्पण करण्याची सिद्धता असणारे मावळे यांच्या साहाय्याने छत्रपती शिवरायांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शून्यातून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. साक्षात जगद्गुरू भगवान श्रीकृष्णाचे सारथ्य आणि मार्गदर्शन यांच्या बळावर पांडवांनी कुरुक्षेत्रावर शंभर कौरवांना पराभूत करून विजय मिळवला. अर्जुनाचा 'कृष्ण कृष्ण' असा अखंड जप चालू असे. श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनामुळेच सर्व प्रकारच्या युद्धनीतीचा अवलंब करत १०० कौरवांसह त्यांच्या बलाढ्य सेनेला पराभूत करणे पांडवांना शक्य झाले. यत्र योगेश्वरः श्रीकृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।। अर्थात ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण आहेत, जिथे गांडीवधारी धनुर्धर अर्जुन आहे तिथे विजय निश्चित आहे. भगवंताच्या अस्तित्वामुळे न्याय नीती आणि धर्माचा विजय झाला. रामायण-महाभारत किंवा कोणत्याही धर्मग्रंथांचा अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येईल की पूर्वी युद्ध सुरु होण्याअगोदर यज्ञयाग केले जात असत. या यज्ञयागांच्या माध्यमांतून विजयासाठी स्वर्गातील देवतांना आवाहन केले जात असे. हिंदू धर्मातील देवतांच्या मूर्ती किंवा चित्र पाहिल्यास लक्षात येईल कि प्रत्येक देवतेचा एक हात आशीर्वाद देणारा असला तरी अन्य हातांमध्ये देवतांनी कोणतेना कोणते शस्त्र आहे. या शस्त्रांचा वापर देवतांनी वेळप्रसंगी केल्याचे दाखले आपल्याला धर्मग्रंथांतून मिळतात. त्यामुळे हिंदू धर्म सहिष्णुतेची शिकवण देत असला तरी क्षात्रधर्म हा सुद्धा हिंदू धर्माचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे युद्धाआधी देवतांना आवाहन करून त्यांचे आशीर्वाद घेण्याची, युद्धासाठी बाळ पुरवण्याकरिता त्यांचे आशीर्वाद घेण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. पहलगाम हल्यानंतर ऑपरेशन सिंदुरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला चांगलीच अद्दल घडवली. तीन दिवसांत पाकिस्तानला नामोहरम करून सोडले त्याचबरोबर पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाईल यांद्वारे केलेले हल्लेही यशस्वीरीत्या परतवून लावले. दोन्ही देशांत सुरु झालेले युद्ध उग्र स्वरूप धारण करेल असे वाटत असतानाच अमेरिकेने हस्तक्षेप करून युद्धबंदी करण्यास लावली. त्याचवेळी कंगाल झालेल्या पाकिस्तानला नाणेनिधीकडून १ अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर करण्यात आले. पाकिस्तानचा आजतागायतचा इतिहास पाहता पाकिस्तानच्या कुरापती काही थांबणाऱ्या नाहीत. मिळालेल्या कर्जाचा वापर पाकिस्तान अस्त्र शस्त्र खरेदीसाठी करून बलशाली बनण्याचा प्रयत्न करेल आणि भारताच्या विरोधात भविष्यात युद्ध पुकारले अशी शक्यता तज्ञ मंडळींकडून व्यक्त केली जात आहे त्यामुळे भारतावरील युद्धाचे सावट काही दूर झालेले नाही. भविष्यात दोन्ही देशांत युद्ध झालेच तर आंतराराष्ट्रीय पातळीवर त्याचे मोठ्या प्रमाणात पडसाद उमटतील हे निश्चित आहे. भविष्यात अशा प्रकारचे युद्ध झाले तर त्यामध्ये भारताचा विजय व्हावा, सैनिकांचे रक्षण व्हावे यासाठी गोव्यात नुकताच शतचंडी यज्ञ पार पडला. विलासभुमी म्हणून ख्याती असणाऱ्या गोव्यात देश विदेशातून पर्यटक येतात ते मौजमजेसाठी. येथील समुद्रकिनारे नेहमीच गजबजलेले असतात त्यासोबत ठिकठिकाणी मद्याच्या बाटल्यांचा खचही पडलेला असतो. अशा या विलासभुमीला गेल्या काही दिवसांपासून मात्र वेगळी ओळख मिळाली आहे. १७ ते १९ मे या कालावधीत गोव्याच्या फर्मागुडी परिसरात भव्य दिव्य असा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव संपन्न झाला ज्याकरिता देशविदेशातून सुमारे ३० हजार साधक आणि हिंदुत्वनिष्ठ गोव्यात आले होते. गोव्यातील समस्त हॉटेल्स, हॉल्स, मंदिरे या ठिकाणी हे भक्तगण तीन दिवस निवासाला होते. गोव्याचे मुख्यमंत्री माननीय प्रमोद सावंत यांसह काही केंद्रीय मंत्री आणि राज्याच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री या कार्यक्रमाला जातीने उपस्थित होते. देशभरातून अनेक संत महंत, कथावाचक, प्रवचनकार यांनी या महोत्सवाला उपस्थिती लावून मार्गदर्शन केले. तीन दिवस संपूर्ण गोवा भक्तिसागरात डुंबत होता. या महोत्सवाचाच एक भाग म्हणून २० ते २२ मे या कालावधीत या ठिकाणी शतचंडी यज्ञ पार पडला. शौर्याला भक्तीची जोड मिळाली की विजय निश्चित असतो त्याप्रमाणे भारताच्या विजयश्रीसाठी केलेल्या या शतचंडी यज्ञामुळे भारतीय सैन्याला नक्कीच ऊर्जा आणि बळ प्राप्त होऊन भविष्यात युद्ध झालेच तर भारताचा विजय निश्चित असेल यात शंका नाही !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खासदार निधीतून उभारलेल्या सभामंडपाचे खा.राजेनिंबाळकर यांच्या हस्ते लोकार्पण



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२४, धाराशिव :** खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मौजे नंदगाव ता. तुळजापुर येथील निप्रश्री शांतलिंगेश्वर विरक्त मठ, नंदगाव येथे १० लक्ष रुपये खर्चून सभामंडपाचे बांधकाम करण्यात आले. खासदार निधीतून लोकार्पण उत्साहात पार पडले. यावेळी महाराज राजशेखर महास्वामीजी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

सभामंडपाच्या उभारणीसाठी खासदार निधीचा उपयोग केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. या सभामंडपाचा उपयोग ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांसाठी तसेच सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांसाठी होणार आहे. कार्यक्रमानंतर गावकऱ्यांनी एकत्र येऊन ग्रामविकास, युवकांचा सहभाग आणि सामाजिक एकजुटीवर चर्चा केली. या कार्यक्रमास कमलाकर चव्हाण, अशोक भाऊ पाटील, गजेंद्र पाटील, प्रकाश चव्हाण, कृष्णाथ मोरे, सूर्यकांत अरबळे, परमेश्वर चिनगुंडे, गिरीश नवगिरे, राजेंद्र जाधव, सोमनाथ परशेट्टी, बाळू मारेकर, राजू मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार निधीतून उभारलेला सभामंडप नंदगाव गावासाठी नवा अध्याय ठरला असून, याचा लाभ येथील ग्रामस्थांला होणार आहे.

## राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वे मार्गला मंजुरी...

## २१ किलोमीटर रेल्वे लाईनसाठी ४१४ कोटींचा खर्च



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** रेल्वे मंत्रालयाने राहुरी-शनिशिंगणापूर या ४९४.१३ कोटी रुपये खर्चाच्या नवीन रेल्वेमार्गाला मंजुरी दिली आहे. २१.८४ किमी लांबीचा हा मार्ग आहे. केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी ही माहिती दिली. शनिशिंगणापूर हे भाविकांची मोठी गर्दी असलेले प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. सध्या येथे थेट रेल्वे सुविधा नसल्यामुळे यात्रेकरूंना अडचणींचा सामना करावा लागतो. नवीन रेल्वेमार्गामुळे या भाविकांसह राहुरी, नेवासा परिसरातील नागरिकांचीही सोय होणार आहे. तसेच शिर्डी, राहुरी, नेवासा परिसरातील धार्मिक पर्यटन स्थळांनाही चालना मिळणार आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या प्रकल्प अहवालानुसार रोज चार जोड्या प्रवासी गाड्यांचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यामुळे वार्षिक १८ लाख प्रवाशांना फायदा होईल, असाही दावा करण्यात आला आहे. या रेल्वेमार्गासाठी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांनी पाठपुरावा केल्याचे डुंगरवाल यांनी सांगितले. शनिशिंगणापूर रेल्वेमार्गामुळे मार्गावर येणार असल्याने भाविकांबरोबरच पर्यटनालाही चालना मिळणार आहे. जिल्हा प्रवासी संघटनेचे हरजीतसिंग वधवा यांनी या नवीन रेल्वेमार्ग मंजुरीचे स्वागत करत पर्यटनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## डॉ.विश्वासराव आरोटे यांनी जपली सामाजिक बांधिलकी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सक्रिय सदस्य व पत्रकार संतोष कोरडे यांच्या कन्येच्या विवाहप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत एक अनोखी भेट देण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने नवदांपत्याला गॅस कनेक्शन भेट म्हणून प्रदान केले. या उपक्रमाने सामाजिक कार्याचा एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.

संतोष कोरडे यांच्या कन्येचा विवाह हा पारनेर तालुक्यातील एक महत्त्वाचा सामाजिक सोहळा ठरला. या विवाहप्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सामाजिक दायित्वाची जाण ठेवत नववधूला स्वयंपाकासाठी आवश्यक असणारे गॅस कनेक्शन भेट दिले. ही भेट केवळ प्रतीकात्मक नसून, नव्या आयुष्याला सुरुवात करणाऱ्या जोडप्याला उपयुक्त ठरणारी आहे. या अनोख्या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये कौतुकाची भावना निर्माण झाली. डॉ. आरोटे यांनी यावेळी सांगितले की, पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून, समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

या सोहळ्याला मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख कुंडलिक वाळेकर आणि अहिल्यानगर डिजीटल मिडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड पत्रकार संतोष कोरडे यांच्या मातोश्री हिराबाई कोरडे ,डॉ विकास वाळुंज वंदना कोरडे, अ‍ॅड साई कोरडे ,यांचीही उपस्थिती होती. त्यांनीही या उपक्रमाचे स्वागत करत पत्रकार संघाच्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. कुंडलिक वाळेकर यांनी यावेळी सांगितले की, अशा छोट्या पण अर्थपूर्ण भेटीमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो. तर, विनोद गायकवाड यांनी पत्रकार संघाच्या या उपक्रमाला एक नाविन्यपूर्ण पाऊल ठरवले. हा उपक्रम पारनेर तालुक्यात चर्चेचा विषय ठरला असून, अनेकांनी याचे कौतुक केले आहे. सामान्यतः विवाहप्रसंगी भेटवस्तू म्हणून कपडे, दागिने किंवा रोख रक्कम दिली जाते. मात्र, गॅस कनेक्शनसारखी उपयुक्त भेट देऊन पत्रकार संघाने सामाजिक बांधिलकीचा एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. या उपक्रमामुळे नवदांपत्याच्या नव्या जीवनाला एक सकारात्मक सुरुवात झाली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने यापूर्वीही अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. या भेटीमुळे संघटनेने पुन्हा एकदा समाजाप्रती आपली जबाबदारी अधोरेखित केली आहे. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला असून, भविष्यात असे उपक्रम अधिक व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## सर्वसामान्यांच्या सेवेसाठी आ.मुनगंटीवार यांचे फिरते जनसंपर्क कार्यालय




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** जनसेवेसाठी सदैव तत्पर असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांचा जनसंपर्क व्यापक आहे. मतदारसंघातीलच नव्हे तर अख्ख्या जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला त्यांच्याकडून विकासकामांची आणि अडचणीत असलेल्यांना मदतीची अपेक्षा असते. अशात आपण स्वतः लोकांपर्यंत पोहोचायला हवे, या उद्देशाने दि.१९ मे पासून सुरू करण्यात आलेले आ. मुनगंटीवार यांचे फिरते जनसंपर्क कार्यालय आता नागरिकांसाठी वरदान ठरत आहे. राज्यातील या एकमेव अभिनव उपक्रमावर कौतुकाचा वर्षाव देखील होत आहे.

आ. मुनगंटीवार यांचे फिरते जनसंपर्क कार्यालय नागरिकांच्या अडचणी, समस्या व तक्रारी थेट त्यांच्या दारी जाऊन ऐकून घेण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे, हे विशेष. या उपक्रमांतर्गत जनतेला त्यांच्या गावात किंवा प्रभागातच आ. सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिनिधी, कार्यालयीन कर्मचारी पोहोचत आहेत. संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून लोकांना सेवा दिली जात आहे. प्रलंबित कामे, शासकीय योजनांच्या लाभातील अडथळे, पायाभूत सुविधांबाबतची मागणी, रस्ते, नळजोडणी, वृद्धापकाळ, निवृत्ती, विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज यांसारख्या विषयांवर जागेवरच निर्णय घेण्याचा प्रयत्न यामधून केला जात आहे. विशेष म्हणजे राज्यात फिरते जनसंपर्क कार्यालय ही संकल्पनाच आ. मुनगंटीवार यांनी पहिल्यांदा राबविल्यामुळे त्याची चर्चा आता सर्वत्र होत आहे.

सत्ता ही खुर्चीसाठी नसून जनतेच्या सेवेसाठी आहे या मूल्यांची जाणिव बाळगून सुरू केलेला हा उपक्रम लोकशाही अधिक बळकट करणारा आहे. शासकीय कार्यालयांच्या वारंवार चकरा मारण्याची गरज सर्वसामान्यांना पडू नये. उलट त्यांच्याच दारात जाऊन मदत पोहोचविली जावी. या उद्देशांची पूर्ती करणारा हा उपक्रम राज्यासाठी एक आदर्श ठरत आहे. राज्यभरातून या अभिनव उपक्रमाचे जोरदार स्वागत होत असून, इतर लोकप्रतिनिधींनाही प्रेरणा देणारा प्रयोग म्हणून त्याकडे पाहिले जात आहे. अनेक ठिकाणी नागरिक आपले प्रश्न मोकळेपणाने मांडत आहेत. त्यावर प्रशासनाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांकडून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जात आहे. फिरत्या जनसंपर्क कार्यालयातून तातडीने कार्यवाही प्रत्येक घरकूल लाभार्थ्याला ५ ब्रास वाळू मोफत देण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत चंद्रपूर, पोंभूर्णा, मुल आणि बल्लारपूर येथील लाभार्थ्यांना वाळू वितरणाचे नियोजन करण्यात येत आहे. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून प्रशासन आणि जनतेमध्ये समन्वय साधत हे काम अधिक प्रभावीपणे पार पडत आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या घरांना भरपाई मिळावी यासाठी मदतीचा पुढाकार घेण्यात आला आहे. नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत मिळण्यासाठी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. अवकाळी पावसामुळे उन्हाळी धान पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. भादुर्णी येथे वाघाच्या हल्लयात झालेल्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. प्रशासनाला मदत तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. फिरते जनसंपर्क कार्यालय आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे कार्यरत आहे. या उपक्रमाद्वारे शेकडो नागरिकांच्या अडचणींवर तात्काळ उपाय करण्यात आले आहे. लोकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवण्यात हे कार्यालय यशस्वी ठरले आहे, हेच या उपक्रमाचे खरे वैशिष्ट्य आहे.

## दीक्षाभूमीचा विकास हा जागतिक दर्जाचा व्हावा : आ. किशोर जोरगेवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र चरणस्पर्शाने पावन झालेल्या दीक्षाभूमीचा. जागतिक पातळीवर विकास करण्याचा संकल्प आ. किशोर जोरगेवार यांनी केला आहे. त्यांच्या प्रयत्नातून या पवित्र स्थळाच्या विकासासाठी ५६ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यातील जवळपास १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

त्यामुळे या कामांना गती देण्याचे निर्देश आ. किशोर जोरगेवार यांनी दिले. पवित्र स्थळाचा विकास नेटका व भव्य व्हावा, यासाठी सर्व विभागांनी आपसात समन्वय साधावा. निधीचा योग्य वापर होईल याची काळजी घ्या, असे ते यावेळी म्हणाले. दीक्षाभूमीच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून आपण प्रयत्नशील होतो. आता निधी मंजूर झाल्यामुळे जागतिक पातळीवर या पवित्र स्थळाचा विकास होईल. दीक्षाभूमी हे जागतिक स्तरावर एक महत्त्वाचे पवित्र स्थान आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मृती जपण्यासाठी, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या ठिकाणाचा विकास अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळेच मागील अनेक वर्षांपासून आपण या विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करत होतो. या निधीतून सभागृह, पथदिवे, उद्यान, पाणीपुरवठा, शौचालय सुविधा, सुरक्षा यंत्रणा, स्थापत्यशास्त्रीय सौंदर्यवृद्धी आणि पर्यटकांसाठी आवश्यक सोयीसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

यामुळे दीक्षाभूमीचा विकास भव्य स्वरूपात होणार आहे. सर्व विभागांनी आपसात समन्वय साधावा. निधीचा प्रत्येक रुपया योग्य कामासाठीच वापरला गेला पाहिजे. कोणत्याही अडथळ्यामुळे विकासकामांना विलंब होऊ देऊ नका, काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने काम करावे. या पवित्र भूमीचा जागतिक दर्जाचा विकास व्हावा, हा आपल्या सगळ्यांचा संकल्प आहे. आपण सर्वांनी प्रामाणिकपणे आणि एकजुटीने काम करावे, अशा सूचना यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहेत. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी दीक्षाभूमीच्या विकासकामाबाबतची सद्यस्थिती जाणून घेतली आणि सर्व प्रक्रिया जलद पूर्ण करून कामाला सुरुवात करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. या बैठकीत विकासकामांची रूपरेषा, निधी वितरण प्रक्रिया, निविदा प्रक्रिया आणि वेळापत्रक याबद्दल सविस्तर चर्चा झाली. जिल्हा प्रशासनाने कामांना गती देण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलण्याचे आश्वासन दिले. आ. किशोर जोरगेवार यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे दीक्षाभूमीच्या विकासकामांना नवा वेग मिळणार आहे. लवकरच हे पवित्र स्थान जागतिक स्तरावर नव्या स्वरूपात ओळखले जाईल, असा विश्वास आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला आहे. दीक्षाभूमीच्या विकास कामाचा आढावा घेण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात बैठक बोलावली होती.

सदर बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद महतुरे, समाज कल्याण विभागाच्या स्मिता बैहीरमवार, सार्वजनिक विभागाचे उपविभागीय अभियंता प्रकाश अमरशेट्टीवार, दीक्षाभुमी ट्रस्टचे उपाध्यक्ष अशोक घोटेकर, कुणाल घोटेकर, राहुल घोटेकर, प्राचार्य दहेगावकर, निवृत्त प्रा संजय बेले, भारतीय जनता पक्षाचे माजी शहर अध्यक्ष दशरथसिंह ठाकुर, भाजप नेते प्रकाश देवतळे, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, मनोज पाल, रवी गुरुनुले, रंजन ठाकूर, करणसिंह बैस, कार्तिक बोरेवार आदींची उपस्थिती होती.

## अहिल्यानगर जिल्ह्यात संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळित



**२७ तारखेपर्यंत पावसाचा यलो अर्लट जारी**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या कमीअधिक स्वरुपाच्या सततच्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळित झाले आहे. जिल्ह्यात शुक्रवारी आणि शनिवारी रात्री जिल्ह्याच्या अनेक भागात जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, शनिवारी पहाटेपासून नगर शहरासह जिल्ह्यात सर्वदूर संततधार पाऊस सुरू होता. दिवसभर ढगाळ वातावरणामुळे सूर्यदर्शन झाले नाही. दुपारी पावसाने उघडीप दिली. त्यानंतर दुपारी चारनंतर पुन्हा पावसाची रिपरिप सुरू झाली.

जिल्ह्यात मे महिन्यातील अलिकडच्या काही वर्षांत सर्वाधिक अवकाळी पावसाची नोंद झाली असून यामुळे हजारो शेतकर्यांच्या भाजीपाला, कांदा पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी वादळामुळे नागरिकांच्या पूशधनासह घरांचे आणि कांदा चाळीचे नुकसान झाले आहे. यासह मोठ्या संख्येने उन्हाळी कांदा व फळबागांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, येत्या २७ तारखेपर्यंत नगर जिल्ह्यात हवामान खात्याने पावसाचा यलो अर्लट जारी केला आहे. यामुळे गेल्या आठ दिवसांपासून भागात सुरू असणारा अवकाळीचा कहर संपण्याची चिन्हे दिसत नाहीत.

दरम्यान, १५ मे नंतर जिल्ह्यात खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतीच्या मशागतीची कामे सुरू होणार आहेत. यंदा मे महिन्याच्या सुरूवातीपासून पाऊस पडत असल्याने अनेक ठिकाणी खरीप हंगामाच्या पूर्व तयारीसाठीची शेतीची कामे रखडली आहेत आणि यंदा लवकरच्या पावसामुळे खरीप हंगामाचे चित्र बदलणार असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात अनेक तालुक्यात जोरदार अवकाळीच्या हजेरीमुळे ग्रामीण भागात पाण्याचे तलाव, ओढे, नाले यांना पावसाळ्याप्रमाणे पाणी आल्याचे दिसत आहे. विशेषतः नगर दक्षिणेतील तालुक्यात पावसाचे प्रमाण अधिक आहे.

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये ; मान्सूनच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, ठाणे :** या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा १० दिवस आधीच आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील.

सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो.

या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेतेपद



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, दीव :** पॅरा, युवा पाठोपाठ बीच खेलो इंडिया स्पर्धेत ही महाराष्ट्राने पदकांची लयलूट करीत आपला ठसा उमटविला आहे. पहिल्या बीच स्पर्धेत महाराष्ट्राने ५ सुवर्णांसह २० पदकांची कमाई करीत उपविजेतेपद पटकावले.दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर संपलेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचा जयजयकार शेवटच्या दिवसापर्यंत घुमत राहिला. पदकतक्यात ५ सुवर्ण, ५ रौप्य, १० कांस्य अशी एकूण २० पदके जिंकून महाराष्ट्राने दुसरे स्थान संपादन केले. ५ सुवर्ण ६ रौप्य, ३ कांस्य अशी एकूण १४ पदकांची कमाई करीत मणिपूरने विजेतेपद खेचून आणले. सर्वाधिक २० पदके जिंकूनही केवळ १ रौप्य पदक कमी असल्याने महाराष्ट्राला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेत महाराष्ट्रासह मणिपूर, नागालँड, हरियाणा व जम्मू-काश्मिर संघाने ५ सुवर्णपदके जिंकण्याचा करिश्मा घडविला. रौप्य पदकांच्या शर्यतीत महाराष्ट्र मागे राहिला. दीव येथील ऐतिहासिक आयएनएस खुकरी स्मारक परिसरातील समारोप समारंभात केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदकाचा करंडक देऊन गौरविण्यात आले.

पथकप्रमुख नवनाथ फरताडे, क्रीडाधिकारी अरूण पाटील यांच्यासह मराठमोळ्या खेळाडूंनी उपविजेतेपदाचा करंडक स्वीकारला.करंडक स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राच्या जयघोषाने परिसर दुमदुमला.खेलो इंडिया स्पर्धेतील यशाबद्दल महाराष्ट्राच्या खेळाडूंचे खडसे यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. खेलो इंडिया बीच गेम्सने एका नवीन युगाची सुरुवात केली आहे, असे सांगून केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे पुढे म्हणाल्या की, खेळाडूंनी आपल्या प्रतिभेच्या तेजाने दीवचे समुद्रकिनारे उजळवले आहेत. खेलो इंडिया बीच गेम्स या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.या गेम्सनी अनेक रोमांचक आणि कमी ज्ञात असलेल्या किनारी आणि जल क्रीडांकडे लक्ष वेधले आहे.महाराष्ट्राच्या पदक विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा सहसंचालक सुधिर मोरे यांनी दृकश्राव्य प्रणालीव्दारे अभिनंदन केले आहे. प्रथमच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राचे ७८ खेळाडू सहभागी झाले होते. यात ४८ पुरूष व ३० महिला खेळाडूंचा समावेश होता. पहिल्या स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट,सागरी जलतरण या स्पर्धेत महाराष्ट्राने पदकाची लयलूट केली.स्पर्धेत भारतातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतला होता.

महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये ३ सुवर्ण, ४ रौप्य व ५ कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही २ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्यपदके महाराष्ट्राच्या नावापुढे झळकवली. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळातही कांस्यपदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरले. मुंबईच्या वैभव काळेने सुवर्णासह ३ पदके, तर साताऱ्याच्या दिक्षा यादवने २ सुवर्ण पदकाना गवसणी घेत महाराष्ट्राचे नाव गाजवले.

## थोडक्यात

### पारनेर बाजार समितीत कांद्याला १८ रुपयांचा भाव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत रविवार, दिनांक २५ मे २०२५ रोजी झालेल्या लिलावात चांगल्या प्रतीच्या कांद्याला १ हजार ७०० ते १ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याची माहिती सभापती किसनराव रासकर व सचिव सुरेश आढाव यांनी दिली. ४ ते ५ वक्कलला चांगल्या प्रतीच्या कांद्याला चांगला भाव मिळाला असून कांद्याच्या भावात वाढ झाली आहे. बाजार समितीत रविवारी २ हजार ४२३ कांदा गोण्यांची आवक झाली. १ ते २ वक्कलला १ हजार ७०० ते १ हजार ८०० रुपये बाजारभाव मिळाला. तर १ नंबरला १ हजार ४०० ते १ हजार ६०० रुपये, २ नंबरला १ हजार १०० ते १ हजार ३०० तर ३ नंबरला ७०० ते १००० हजार रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळाला. पारनेर बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांच्या सोयीसाठी कांदा लिलाव रविवारी, बुधवारी व शुक्रवारी चालू ठेवण्यात आल्याची माहिती किसनराव रासकर व उपसभापती किसनराव सुपेकर यांनी दिली आहे. शेतकऱ्यांनी आपली फसवणूक टाळण्यासाठी बाजार समितीतच कांद्याची विक्री करावी असे आवाहन माजी उपसभापती बापूसाहेब शिर्के यांनी केले. दरम्यान अवकाळी पावसामुळे पारनेर तालुक्यातील कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.

# संभाव्य कोविडचा मुकाबला करण्याकरिता पनवेल महानगरपालिका सज्ज



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, पनवेल :** कोविड १९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता पनवेल महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक संपन्न झाली. त्यावेळी महापालिका क्षेत्रातील सर्व संबंधित यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिले आहेत. यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, आरोग्य व स्वच्छता विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये चितळे यांनी कोविड संदर्भातील सद्यस्थितीचा, उपलब्ध सोयी सुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी कोविड करिता सज्ज होण्यासाठी महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यानुसार महानगरपालिकेने आपली तयारी पूर्ण केली आहे.

कोविड रुग्णांच्या विलगीकरणाकरिता वायएमटी कॉलेजच्या निमिशा रुग्णालयात १०० खाटांचे सीसीसी (कोविड केअर सेंटर) विलगीकरण कक्ष उभारण्याची तयारी करण्यात आली आहे. तसेच कळंबोली डीसीएच येथे ३० ऑक्सिजन बेड व ६ आयसीयू बेड तयार ठेवण्यात आले आहेत. यामधील ऑक्सिजनचे सिलेंडर, पाईपलाईन यांची तपासणी तसेच सर्व उपकरणांची दुरुस्ती व पुर्नतपासणी आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार करण्यात आली. तसेच उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे ५० खाटा आरक्षित करण्याबाबत व एमजीएम रुग्णालयामध्ये ५० खाटा आरक्षित ठेवण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. यानुसार संबंधित रुग्णालयांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अशाप्रकारे किमान २०० ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा असणार्या खाटा सुसज्ज करण्यात आल्या आहेत.


पनवेल महापालिकेच्या मोल एक्स्पर्ट या आरटीपीसीआर लॅब मध्ये दररोज १ हजार ५०० आरटीपीसीआर चाचण्या करण्याची क्षमता असणारी यंत्रणा पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आली आहे. याकरिता आवश्यक रसायने उपलब्ध करण्यात आली आहेत. कोविडचा प्रादुर्भाव वाढल्यास आवश्यक ट्रसिंग, व टेस्टिंग करिता विशेष पथके तसेच डीसीएच, सीसीसी सेंटर येथे आवश्यक टेक्निकल मनुष्यबळ (डॉक्टर नर्सेस) इत्यादीं तयार ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात आयसीयू व ऑक्सिजन चे पेशंट वाढल्यास ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या कंपनीसोबत देखील संपर्क करून मुबलक ऑक्सिजन पुरवठा होण्याबाबत दक्षता घेतली आहे. सीसीसी सेंटर करिता आवश्यक रुग्णांचे जेवण, खाटा, अंथरुण, पांघरूण तसेच दैनिक वापराचे साहित्य उपलब्ध करण्याकरिता भांडार विभाग सुसज्ज ठेवण्यात आला आहे.

पालिका क्षेत्रात आवश्यक धूर फवारणी, औषध फवारणी, स्वच्छता करण्याकरिता प्रभागनिहाय विशेष पथके नेमली असून याकरिता आवश्यक सॅनिटायझर, हॅण्ड वॉश, सोडियम हायपोक्लोराईट इत्यादीसारखे साहित्यांची खरेदी करण्यात आली आहे. डीटीएच व सीसीसीमध्ये रुग्णांकरिता आवश्यक औषधसाठा तयार ठेवण्या बाबत आयुक्तांनी आदेशित केले आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात पूर्वी 'कोविड रुग्णालय' म्हणून काम केलेल्या सर्व खाजगी रुग्णालयांशी संपर्क साधून इच्छुक कोविड समर्पित रुग्णालयांसाठीची माहिती मागविण्यात आली आहे तसेच आवश्यकता पडल्यास पूर्वीच्या कोविड लाटेतील कार्यरत रुग्णालयांना तातडीने सज्ज राहण्याबाबत सूचना देण्यात आले आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रातील पालिकेच्या ५ ॲम्बुलन्स (बीएलएस) तयार असून इतर २ एएलएस साठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच खाजगी ॲम्बुलन्स सेवा, शासनाची १०४ ॲम्बुलन्स यांचे नंबर 'पनवेल कनेक्ट' या पालिकेच्या ॲपवर प्रसारित करण्यात आले आहे जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्ण ॲपद्वारे रुग्णवाहिकेशी तातडीने संपर्क साधू शकेल. पनवेल महापालिकेचे २४ ÷ ७ कॉल सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे. पालिकेकडे असणारे ऑक्सिजनचे एलएमओ व पीएसए प्लॅन्ट तपासणी करून तातडीने कार्यान्वित करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. खाजगी रुग्णालय व लॅब यांना कोविड रुग्णाबाबत तातडीने माहिती देण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

खाजगी रुग्णालय तसेच पालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आयएलआय व साथीच्याच्या रुग्णांवर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सूचना देण्यात आले आहेत, तसेच क्षेत्रनिहाय कुठे साथीचे आजार बळावत असतील तर त्यावर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सूचना आरोग्य कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. नवीन व्हेरियंट बाबत माहिती व आवश्यक उपाय योजनांबाबत उहापोह करण्याकरिता कोविड कार्य दलाच्या बैठकीचे आयोजन पुढील आठवड्यात करण्यात आले आहे. एकूणच सर्व पार्श्वभूमीवर सर्व प्रकारच्या दक्षता घेत पनवेल महापालिकेने कोविड १९ चा मुकाबला करण्यासाठी आपली सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

### सुपा शहरासह परिसरात विद्युत पुरवठ्याचा खेळखंडोबा



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा परिसरात गेल्या ८ ते १० दिवसापासून ढगाळ व पावसाचे वातावरण निर्माण होत आहे. या दरम्यान परिसरात विद्युत पुरवठ्याचा खेळखंडोबा उडाला असून महावितरण विरोधात नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्ता केला जात आहे. सुमारे १० ते १२ गावांचे केंद्रबिंदू व मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा शहरात गेल्या १० दिवसापासून विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. वीज बिल भरण्यासाठी जशी तत्परता दाखवली तशी वीजपुरवठा खंडित झाल्यावर का दाखवत नाही असा संतप्त सवाल प्रामस्थांमधून उपस्थित केला जात आहे. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात महावितरणचे अभियंता व कर्मचारी सपशेल अपयशी ठरत असून सध्या पावसाचे दिवस असल्याने डासांमुळे व भयंकर उष्णतेमुळे नागरिकांना रात्र रात्र जागून काढण्याची वेळ आली आहे. चालु वर्षी पावसाळा हा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्धात सुरू झाला आहे. शेतीसाठी सोडा पण पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नाही थोडे फार पिण्यासाठी पाणी निघते मात्र त्यासाठी विद्युत पुरवठा होत नसल्याने पिण्याच्यापाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सुपा ४३ केव्ही उपकेंद्रातून सुपा शहरा दिवसातून दहा ते बारा वेळा वीज पंधरा ते वीस मिनिटे गायब होते. यामुळे व्यावसायिकांकडून मोठी नाराजी व्यक्त होत आहे. कॉलेज रोड, औद्योगिक वसाहत, कोल्हे वस्ती, वाळवणे सह कडूस फिडरसाठी आपधूप, वाघुंडे, बाबुर्डी,रुईछवपती, भोयरे गांगर्दा, कडूस आदी ठिकाणी शेती पंप व सिंगल फेज (घरांसाठी) विद्युत पुरवठा केला जातो. या भागात गेल्या दहा दिवसांपासून विजेचा लपंडात सुरू असल्याने पिण्याच्या पाण्यासह या गावांचा संपर्क तुटला आहे. विजेवर चालणारे विविध कंपण्यांचे मोबाईल टावर बंद झाल्याने सर्व व्यवहारच कोलमडले.

### बिलोली आगारात नव्या बसेसचे उद्घाटन व लोकार्पण



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, बिलोली (नांदेड) :** एस.टी आगारात आमदार जितेश अंतापुरकर यांच्या पाठपुराव्यामुळे नवीन पाच बसेस दाखल झाल्या असून आमदार अंतापुरकर यांच्या हस्ते बसेसचे पुजन करून लोकार्पण करण्यात आले. बिलोली तालुक्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी वेळेवर एसटी बसेस उपलब्ध व्हाव्यात. यासाठी बिलोली देगलूर विधानसभेचे विद्यमान आमदार जितेश अंतापुरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे देगलूर बिलोली आगरा साठी नवीन बसेस मिळाव्यात. अशी मागणी लेखी पत्राद्वारे केली होती. त्या मागणीला अनुसरुन परिवहन विभागाकडून बिलोली आगारासाठी ९ बस मंजूर झाल्या आहेत. त्याचे लोकार्पण बिलोली एसटी बस स्थानकावर आमदार जितेश अंतापुरकर आणि मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन नारळ फोडून, प्रवाशाना व कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप करून करण्यात आले बिलोली आगारात सध्या एकूण ५५ बसेस आहेत. त्यात आता आणखी ९ बसेसची भर पडली असल्याने प्रवाशांची गैरसोय दुर होईल असा विश्वास आमदार महोदयांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार जितेश अंतापुरकर भाजपा जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण ठक्करवाड, ऊमाकांत गोपछडे, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष सतिश मोतीवार, माजी नगराध्यक्ष विजयकुमार कुंचनवार, हाजप्पा पाटील सुंकलोड, बिलोली शहर मंडळ अध्यक्ष इंद्रजित तुडमे, कुंडलवाडी शहर मंडळ अध्यक्ष हानमल्लु इरलावार, बिलोली पूर्व मंडळ अध्यक्ष मारोती राहीरे, पश्चिम मंडळ अध्यक्ष शिवराज बोधणे, शंकरराव काळे, संजय पाटील भोसले, विश्वनाथ समन, संभाजी शेळके, राजकुमार गादगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा तालुकाध्यक्ष निळकंठ पाटील दुडले, शहराध्यक्ष मिलिंद मांजरमकर, संदीप रामपूरे, मुन्ना पोवाडे आगार प्रमुख नरसिंग निम्मनवाड यांच्यासह आगारातील चालक, वाहक, तांत्रिक कर्मचारी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांचा दौरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नांदेड :** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या सोमवार, दिनांक २६ मे २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. दिनांक २६ मे २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथून विमानाने दुपारी १२ वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी ३ वा. माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळयाच्या अनावरण कार्यक्रमास उपस्थिती स्थळ- नागार्जुन कॉर्नर वसंतराव नाईक चौक नांदेड. दुपारी ३.३५ वा. खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन स्थळ- तुळजाई कॉम्पलेक्स भाग्यनगर नांदेड. दुपारी ३.५० वा. नवामोंढा मैदान नांदेड येथे आगमन. दुपारी ४ वा. केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर जनसभेस उपस्थिती. सायं. ५.३५ वा. नवामोंढा मैदान येथून शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सायं ५.४० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव.

सायं ७ वा. भारतीय जनता पार्टी महानगर कार्यालयाकडे रवाना स्थळ- नाना-नानी पार्क नांदेड. रात्री ७.२५ वा. खासदार अशोकराव चव्हाण यांच्या निवासस्थानाकडे रवाना. रात्री ७.३० वा. खासदार अशोकराव चव्हाण यांच्या निवासस्थानी आगमन व राखीव. रात्री ९ वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेडकडे रवाना. रात्री ९.१५ वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. रात्री १० वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथून मुंबईकडे रवाना होतील.

## शेतकऱ्याचे पैसे पळविणाऱ्या टोळीस कुंडलवाडी पोलिसांनी पकडले



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरातील बँक ऑफ बडोदा बँकेतून काढून आणलेली पावणेतीन लाख रुपये रकमेची बॅग चोरट्यांनी हिसकावून पळ काढल्याची घटना दि.२२ नोव्हेंबर रोजी कुंडलवाडी ते धर्माबाद रोडवर सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास घडली होती. या प्रकरणात पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने चोरट्यांची ओळख पटवून तिघांना अटक केली. त्यांच्याकडून ८० हजार रुपये रोख आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. येथून जवळ असलेल्या दौलपूर येथील आत्माराम गंगाराम देगावे या शेतकऱ्यांने दि.२२ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास कुंडलवाडी येथील बैंक ऑफ बडोदामधून २ लाख ७० हजार रुपये काढले होते. त्यानंतर पैशाची बॅग दुचाकीच्या हँडलला अडकवली होती. ते महालक्ष्मी मंदिर परिसरात आले असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी बॅग हिसकावून पळ काढला.

या प्रकरणात कुंडलवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. सपोनि. ज्ञानेश्वर शिंदे यांचे पथक या प्रकरणाचा तपास करीत होते. पोलिसांनी रस्त्यावरील सर्व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यावरून आरोपीची ओळख पटविण्यात आली. त्यावरून शेख आफताब शेख अहमद (रा.कळंबा, जि.कोल्हापूर) याला उचलण्यात आले. त्याने शेख सद्दाम शेख सलीम आणि सय्यद अमान सय्यद हारुण (रा.इस्लाम पुरा, उमरी) या दोघांच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. यानंतर दोघांनाही अटक करण्यात आली आहे. कुंडलवाडी पोलिसांनी ५ महिन्यानंतर शेतकऱ्याचे पैसे लुटणाऱ्या टोळीस गजाजाड केल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.